


सुरेश खरे
असुनी
नाथ
मी
अनाथ

FOR FUNDAMENTAL RESEARCH

सुरेश खरे

# असुनी नाथ मी अनाथ

**जोशी ब्रदर्स**
बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे २

**मूल्य रुपये पाच**

पहिली आवृत्ती
एप्रिल १९७३

या नाटकाच्या प्रकाशनखेरीज भाषांतर, रूपांतर, नभोनाट्य, चित्रवाणी, चित्रपट वगैरे सर्व हक्क सौ. सुप्रिया खरे, डी – २४ बाळगोविंद को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, टपकलवाडी, माहीम, मुंबई – १६, यांजकडे आहेत. पूर्वसंमतीशिवाय या नाटकाचा कोणत्याही स्वरूपात वापर केल्यास कायदेशीर इलाज करण्यात येईल.

—सुरेश खरे

प्रकाशक
केशव वामन जोशी
२५ बुधवार पेठ
अप्पा बळवंत चौक
पुणे २

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे ३०

## असुनी नाथ मी अनाथ

'असुनी नाथ मी अनाथ' हे नाटक माझ्या हातून लिहून पूर्ण होईल असा भरवसा मला कधीच नव्हता. एका अवघड नाजुक विषयाला मी हात घातला खरा, पण यशाची शाश्वती नव्हती. व्यावहारिक यशापयशाची फिकीर मला नाही, कधीच नव्हती. मला सतत एकच भीती वाटायची मी इतक्या गंभीरपणे हा विषय हाताळतोय्– अर्थात माझ्या कुवतीप्रमाणे– पण अतिशय प्रामाणिकपणे, तर हे गांभीर्य, हा प्रामाणिकपणा, ही तळमळ प्रेक्षक समजू शकतील का? आवडणं, न आवडणं हा पुढचा भाग! त्याचे हिशेब मी कधी करीत नाही. पण 'समजणं' हा फार महत्त्वाचा भाग, त्याची फिकीर मी अवश्य करतो. माझं नाटक प्रेक्षकांना 'किमान समजायला' हवं अशी माझी अपेक्षा असते. अतिशय वेगळे विषय, प्रक्षोभक समस्या मला आकर्षित करतात. या दुनियेतलं लपलेलं नाट्य मला अस्वस्थ करतं, झपाटून टाकतं. या बकाल शहरी जीवनात पैशामोवती फिरणाऱ्या वेगळी दुनियेत या नाटकातली समस्या मला सापडली. पण हे नाटक कोणत्याही एका समस्येचं नाही. नपुंसकत्व, व्यभिचार, पौगंडावस्थेतील प्रेम, अशा इतर समस्यांची गुंफण या नाटकात मी केली आहे. पत्नीचा सौदा करून वैभव मिळवणारे पुरुष... माझ्या दृष्टीनं ते नपुंसकच! शरीराने पुरुष असले तरी! यातूनच नपुंसकत्वाची समस्या आपोआप कथेत घुसली... आणि मग नाटक वेगवेगळ्या पातळ्यांवर फुलत गेलं. मी कितपत यशस्वी झालो आहे... मला सांगता नाही यायचं! एक मात्र निश्चित. प्रेक्षकांनी माझी भीती खोटी पाडली. प्रेक्षक ही समस्या गंभीरपणे पाहू शकतात.

तर हे असं आहे! नंदकुमार रावते, त्यांनी सतत 'त्रास' दिल्यामुळं हे नाटक पूर्ण झालं. दिग्दर्शक नंदकुमार रावते आणि ललित-कला साधनेचे कलाकार यांनी सर्वस्व पणाला लावून हे नाटक उभं केलं. प्रेक्षकांना हे नाटक आवडलं तर यशात सिंहाचा वाटा त्यांचा, नाही आवडलं तर हे अपयश माझं!

सुरेश खरे

'असुनी नाथ मी अनाथ' या नाटकाचा प्रथम प्रयोग रविवार दिनांक चार फेब्रुवारी एकोणीसशे त्र्याहत्तर रोजी सकाळी दहा वाजता रवींद्र नाट्यमंदिर, मुंबई, येथे ललित कला साधना या संस्थेतर्फे सादर करण्यात आला. त्यात भाग घेणारे कलावंत :

**कलावंत**

| | |
|---|---|
| **हेमंत** | **सुनीती** |
| विनायक जोशी | आशा पोतदार |
| **अण्णा** | **धारकर** |
| रमेश होनावर | शशिकान्त राजाध्यक्ष |
| **ज्यूली** | **बेंद्रे** |
| कुंदा निरगुडकर | हरीश पाटारे |

**राजीव** : राजा बापट

| दिग्दर्शक | नेपथ्य-प्रकाशयोजना | रंगभूषा |
|---|---|---|
| **नंदकुमार रावते** | **बाबा पार्सेकर** | **शांताराम विचारे** |
| | ध्वनिसंकलन | ध्वनिसंयोजन |
| | **राजा देसाई** | **लक्ष्मण आंगणे** |
| | निर्मितिप्रमुख | रंगमंच व्यवस्था |
| | **परशुराम** | **छोटा लिमये** |
| | **सराफ** | **अरुण भागवत** |
| | **छाय** | **अप्पा अणावकर** |
| | **राजदत्त** | **विकास पवार** |
| | | **चंद्रकान्त** |

# अंक पहिला

## दृश्य पहिले

[ हेमंतचा दिवाणखाना. सजावट व्यवस्थित. प्रयत्नानं नीटनेटकी. परंतु एकूण मांडणीवरून आणि वस्तूंवरून या घरात बाईमाणूस नसावं याची कल्पना यावी. वेळ – संध्याकाळ. हेमंत प्रवेश करतो. ]

**हेमंत** : या... तसं माझं हे घर, 'घर' म्हणून पहाण्यासारखं नाही. मी इथं राहतो म्हणून याला घर म्हणायचं इतकंच. आणि शिवाय मी तसा फारसा व्यवस्थित माणूस नाही.

**अण्णा** : पण तसं वाटत नाही.

**हेमंत** : नाही, आता तसं कदाचित् वाटणार नाही. कारण तुम्ही येणार म्हणून सकाळी जरासं आवरून ठेवलंय्.

**अण्णा** : काय सुनीती, कसं काय वाटतंय् ?

**सुनीती** : छान आहे...

**हेमंत** : उगाच काय खोटं सांगताय्.

**सुनीती** : खोटं नाही, खरंच...

**हेमंत** : ठीक आहे... पण तुम्ही कशाला हे वाईट म्हणाल ?

**अण्णा** : खरं सांगू का हेमंतराव, तुम्ही घर कसं आवरलंय् हे बघण्याकरता आम्ही नाही इथं आलो. पण निदान तुम्ही रहाता कुठं, तुमची जागा कशी काय आहे, एवढंच बघायचं होतं मला, आपण राग मानू नका, पण माझं कर्तव्य नाही का ते ?

**हेमंत** : छे छे ! रागवायचं काय कारण ?

**अण्णा** : मुलीचं लग्न करून तिला दुसऱ्याच्या घरी पाठवायची, माणूस आपल्यापरीनं जितकं बघता येईल तितकं बघतो. आणि माझ्या अनाथाश्रमातल्या प्रत्येक मुलीकडे मी पोटची मुलगी या दृष्टीने पहातो.

**हेमंत** : आपण उभे का आहात ? बसा ना... ( सुनीतीला ) बसा ना.

**सुनीती** : नको... असू दे...

**अण्णा** : अग, बस... आता हे घर तुझं होणार आहे. इथं परकं वाटायचं कारण नाही... ( सुनीती बसते )

**हेमंत** : तर इथं मी एकटा रहातो. मला फारसे नातेवाईकही नाहीत. एक बहीण आहे. ती बिहारात असते. लग्न झालंय् तिचं. तिचे मिस्टर इथल्या एका माईनवर आहेत. कधी काळी चार-पाच वर्षांनी इथं येते. मुंबईत माझे कुणीच नातेवाईक नाहीत. माझी आई माझ्या लहानपणीच वारली, वडील जाऊन दहा-अकरा वर्षं झाली. त्या दिवशी ऑफिसमध्ये आपल्याला फारसं बोलता आलं नाही. तुम्ही आज घरी आलात ते एका दृष्टीनं फार बरं झालं. माझी सर्व माहिती तुम्हांला मला सांगता आली.

**अण्णा** : आभारी आहे मी तुमचा. तुमचा हा मोकळेपणा आवडला मला.

**हेमंत** : छे छे ! यात मोकळेपणा कसला ? माझं कर्तव्य आहे ते. माझ्याविषयी सारं जाणून घेण्याचा तुमचा हक्क आहे. निदान यांचा तरी. एक मिनिट...अण्णासाहेब, मला तुम्हांला एक गोष्ट विचारायची आहे...

**अण्णा** : कशासंबंधी ?

**हेमंत** : माझ्यासंबंधीच. मी बिजवर आहे याची कल्पना आहे यांना ?

**अण्णा** : ती मी प्रथमच दिली. चोरून फसवून काहीच केलं नाही.

**हेमंत** : ( सुनीतीला ) तुम्हांलाच सरळ विचारतो. माझ्यासारख्या बिजवराशी लग्न करणं आवडेल तुम्हांला ? तुमची काहीच हरकत नाही ? अगदी प्रामाणिकपणे आणि खरं खरं सांगा. मुद्दाम अण्णासाहेबांच्या देखत विचारतोय्. आयुष्याचा प्रश्न असतो हा. राजीखुषीनं तुम्ही माझ्याशी लग्न करणार असाल तर...

**सुनीती** : तुम्हांला विचारायच्या आधी अण्णांनी मला विचारलं होतं. तुला असं चालेल का ? अण्णांनी मुळीच माझ्यावर कसलीच सक्ती केली नाही.

**हेमंत** : मला तसं म्हणायचं नव्हतं.

**अण्णा** : तसं विचारलंत तरी हरकत माही. मला मुळीच राग नाही त्याचा.



**हेमंत** : मग ठीक आहे. मला आणखी काही सांगायचं नाही.

**अण्णा** : मग हे सगळं नक्की समजायचं ना ? म्हणजेच लग्नाचं...

**हेमंत** : माझ्याकडून नक्की. अर्थात यांच्या काही अपेक्षा...

**सुनीती** : माझ्या कसल्या अपेक्षा ?

**अण्णा** : हेमंतराव, अनाथ मुलगी आणखी काय अपेक्षा ठेवणार. तुम्हांला मी हिच्याविषयी सारं सांगितलंच आहे. माझ्या अनाथ आश्रमात कडक शिस्तीखाली वाढल्याय ती. हुशार आहे, मर्यादशील आहे...

**सुनीती** : अण्णा पुरे ना...

**अण्णा** : पुरे नाही बेटा, एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे... हेमंतराव, त्या दिवशी मी तुम्हांला सांगितलंच होतं. हिचा जन्म कुठे झाला, हिचे आईवडील कोण याविषयी मला काही माहिती नाही. ही गोष्ट पुन्हा एकदा लक्षात घेऊन तुम्ही ‘हो’ ‘नाही’ काय ते सांगा, पुन्हा एकदा. असं म्हणतोय् कारण मी जेव्हा प्रथम लग्नाचं प्रपोजल दिलं, तुमच्या ऑफिसात, तेव्हा तुम्ही नकार दिला होतात. मला वाटलं तो कदाचित याच कारणामुळे असेल.

**हेमंत** : नाही... ते कारण नव्हतं...

**अण्णा** : मग तुम्ही नाही का म्हटलंत ? ( हेमंत स्तब्ध ) गैरसमज करून घेऊ नका. मी अशा करता पुन्हा पुन्हा विचारतोय्, तुमच्या मनात काही असलंच तर ते दूर व्हायला हवं. एकदा लग्न झाल्यावर माझ्या मुलीला किंवा तुम्हांला कसलाही त्रास व्हायला नको.

**हेमंत** : माझी कारणं फार वेगळी होती....पण...पण आता...मी आपल्याला नको म्हटलं ते तुमच्या मुलीत काही वाईट आहे म्हणून नाही. तर ती कारणं माझ्याशीच संबंधित होती. मग विचार केला आणि लग्न करावं असं वाटायला लागलं. म्हणून तुम्हांला पत्र पाठवलं. बस्स दुसरं काही नाही.

**अण्णा** : तुम्ही हे सांगितलंत...माझं समाधान झालं. लग्न रजिस्टर्ड करायचं ना ?

**हेमंत** : अर्थात तुम्ही कोणताही खर्च करावा अशी माझी अपेक्षा नाही; शिवाय तुम्हांला माहीतच आहे माझं हे...

**अण्णा** : आलं लक्षात. सुनीती जरा मी जाऊन येतो.

**सुनीती** : कुठं चाललात अण्णा...

**अण्णा** : जरा खाली जाऊन पेढे घेऊन येतो. देवापुढे ठेवायला...

**हेमंत** : माफ करा ! आमच्याकडे देव नाहीत. म्हणजे खरंच नाहीत.

**अण्णा** : एखादी तसबीर...

**हेमंत** : तसबीर पण नाही...हो, पण एक कॅलेंडर आहे..

**अण्णा** : चालेल... आलोच हं पाच मिनिटांत. [ जातात ]

**हेमंत** : ( सुनीतीला ) बसा ना... मी एक गोष्ट विसरलोच. तुम्हांला मी आल्यापासून चहा-कॉफीचं विचारलं नाही...

**सुनीती** : मी करू का ?

**हेमंत** : छे छे ! तुम्ही कशाला...

**सुनीती** : खरं म्हणजे चहाची मुळीच आवश्यकता नाही.

**हेमंत** : नाही तर राहिलं. जागा आवडली...?

**सुनीती** : खूप आवडली. आणि तुमचा स्वभाव पण. तुम्ही खूप साधे आहात.

**हेमंत** : ( हसत ) तुम्हांला वाटतो तितका साधा नाही मी. म्हणजे कुठलाच नवरा नसतो. जगातल्या सगळ्या नवऱ्यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे असतात. बायकांचे पण...

**सुनीती** : माझ्यासारख्या अनाथ मुलीशी तुम्ही लग्न करताय्...

**हेमंत** : हे असं पुन्हा पुन्हा बोलायचं नाही. मी तुमच्यावर 'उपकार' नाही करीत आहे. लग्न हा परोपकार नाही. व्यवहार असतो.

**सुनीती** : मला माहीत आहे तुम्ही माझ्या समाधानाकरता बोलत आहात. पण तरीही तुमचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. तुम्ही खूप साधे आहात. हो. हे देखणं रूप असूनसुद्धा कित्येकांनी माझ्याशी लग्न करायला नकार दिला. ना माझ्या आईवडीलांचा पत्ता, ना कसलाच ठावठिकाणा. वयावरची गरजू स्थळं चालत आली पण माझ्या वयाला, रूपाला शोभेसं कुणीच मिळालं नाही. अण्णा हट्टाला पेटले. किती जोडे त्यांनी झिजवले मला कल्पना नाही करता यायची. अण्णा मला नेहमी म्हणायचे, पोरी, तुला शोभेसा नवरा हुडकून काढल्याशिवाय मी मरणार नाही. आणि शेवटी तुम्ही भेटलात. खरंच अण्णांना आज किती बरं वाटलं असेल !

**हेमंत** : आणि तुम्हांला...

**सुनीती** : तुम्ही मला 'तुम्हीच' म्हणणार ?

**हेमंत** : बरं... 'तुला'... तुला काय वाटतंय्...

**सुनीती** : खरं सांगू ? शब्दांत नाही सांगता यायचं... लग्न ठरतं त्या दिवशी मुलीला काय वाटतं हे समजण्याकरता स्त्रीचा जन्मच हवा. थोडीशी अनामिक भीती, थोडीशी हुरहूर. खूपसा आनंद. जबरदस्त ओढ... असंच काहीसं. काही सांगता येण्यासारखं, काही शब्दांत वर्णन न करता येण्यासारखं. खरंच. आज मी पुण्याला परत जाणार. पण तिथं मला सारखे तुम्ही आठवत राहाल, सारखे तुम्ही डोळ्यांसमोर येत राहाल.

**हेमंत** : तुम्ही फार भावनाप्रधान आहात...

**सुनीती** : प्रत्येक स्त्री अशीच असते.

**हेमंत** : असं ?

**सुनीती** : तुम्हांला कल्पना नाही ?

**हेमंत** : नाही...

**सुनीती** : ( टेबलावरचा फोटो उचलत ) तुमच्या बायकोचा ?

**हेमंत** : ( तिच्या हातातून घेतो. ड्रॉवरमध्ये टाकतो. ) हो.. सकाळी आवराआवर करताना चुकून बाहेर राहिला...

**सुनीती** : कशानं गेली तुमची पहिली बायको ?

**हेमंत** : अपघातात.

**सुनीती** : आय ॲम सॉरी...

**हेमंत** : इटस् ऑल राईट.

**सुनीती** : माफ करा ! मी उगाचच तुम्हांला जुन्या गोष्टींची आठवण करून दिली. परत कधीही मी या विषयावर बोलणार नाही. तुम्ही अप्सेट होऊ नका.

**हेमंत** : जाऊ दे...

**सुनीती** : खरं म्हणजे मी असं विचारायला नको होतं. पण स्त्रीला कधीच रहावत नाही असा प्रश्न विचारल्याशिवाय. मला माफ करा. तुम्ही खूप भोगलं असेल आयुष्यात. आयुष्यभर तुम्हांला सुखी करण्याकरता मी झटेन.

वचन देते मी. ( हेमंत अतिशय अस्वस्थ. स्तब्धता. अण्णा प्रवेश करतात. )

**अण्णा** : ( सुनीतीला ) हे घे. पहिल्यांदा देवापुढं ठेव. ( सुनीती देवाच्या कॅलेंडरपुढे पेढे ठेवते. देवाला आणि नंतर अण्णांना नमस्कार करते. )

**अण्णा** : ( सुनीतीला जवळ घेतात. तिच्या डोळ्यांत पाणी. ) हेमंतराव, आज मी किती आनंदात आहे हे तुम्हांला समजायचं नाही. तुम्ही फार मोठे आहात. अशी माणसं भेटली की, हे अनाथाश्रमाचं काम करायला हुरूप येतो. या मुलीला तुम्ही पदरात घेतलं. या म्हाताऱ्यावर अनंत उपकार आहेत तुमचे...( हेमंत गलबललेला. सुनीती हेमंताला नमस्कार करते. )

**हेमंत** : एक मिनिट थांबा...मला वाटतं...

**अण्णा** : काय झालं...?

**हेमंत** : की...हे लग्न .. ( टेलिफोनची बेल वाजते. टेलिफोन उचलतो.) हॅलो...होय. साहेब...मी हेमंत बोलतोय...नाही...नाही...सारं नक्की ठरलंय्...उद्या डीटेलमध्ये सांगतो. ओ. के. ...( ठेवतो. ) सॉरी...आमच्या साहेबाचा फोन होता. तर मग मी काय म्हणत होतो. लग्नाची तारीख शक्य तितक्या जवळची घ्या...

**अण्णा** : बरं ! मग आम्ही निघू ? ( सुनीती जाते ) अरे हो... एक गोष्ट विचारायची राहिली

**हेमंत** : कोणती ?

**अण्णा** : म्हणजे तुम्हाला राग येणार नसेल तर विचारतो.

**हेमंत** : असं काय विचारायचंय् ?

**अण्णा** : ही जागा.. तुमची स्वतःची आहे ना ?

**हेमंत** : ( रिलीव्हड् ) हात्तिच्या !...एवढंच विचारायचं होतं ?

**अण्णा** : तुम्हांला हे महत्त्वाचं नसेल वाटत...पण मला वाटतंय्...

**हेमंत** : माझी हरकत नाही ! ही जागा भाड्याची आहे– पण माझ्या नावावरती आहे—

**अण्णा** : ठीक आहे. आणखी एक विचारायचं आहे— लग्न मुंबईला करायचं की पुण्याला ?

**हेमंत** : एवीतेवी रजिस्टर्ड करायचं आहे– कुठंही सारखंच. पण मुंबईला करू ! मला सोईचं होईल ते !



**अण्णा** : मग मी चलतो– पुढच्या आठवड्यात तुम्हांला परत भेटतो मी– म्हणजे दिवस वगैरे सर्व ठरवता येईल !

**हेमंत** : पण एक लक्षात ठेवा– मला हे लग्न लांबणीवर टाकायचं नाही.

[ अण्णा जातात ]

— अंधार —

### दृश्य दुसरे

[ हेमंतची बेडरूम...रात्रीचे ११ वाजले आहेत. हेमंत प्रवेश करतो. सुनीती पलंगावर बसलेली ]

**हेमंत** : किती छान दिसतेस तू ?

**सुनीती** : इश्श !

**हेमंत** : लाजल्यावर आणखीनच सुंदर !

**सुनीती** : नको नं !

**हेमंत** : एऽ लाजाळू – किती लाजशील ? मला लाजतेस ? तुझ्या नवऱ्याला ? एऽ जवळ ये ना !– नाही– पण नको.

**सुनीती** : काय झालं ?

**हेमंत** : सायलीचा गजरा घातला आहेस ?

**सुनीती** : तुम्हांला आवडत नाही ?

**हेमंत** : आवडतो– पण–

**सुनीती** : पण काय ?

**हेमंत** : तो धुंद वास मला बेभान करतो आणि...

**सुनीती** : आणि काय ?

**हेमंत** : काही नाही ! ( तिच्याजवळ येऊन निरखून पहात ) वाऽ ! ब्यूटिफुल ! तुझ्या ओठावर तीळ आहे !

**सुनीती** : इश्य !– मी नाही.

**हेमंत** : मी नाही काय ?

**सुनीती** : हे हो काय ?